# नव अनुष्टुभ

जुलै-ऑगस्ट २०१८



नव
# अनुष्टुभ्

वर्ष : तेरावे । अंक : चौथा

जुलै-ऑगस्ट २०१८



## अनुक्रम

- बारा कविता / **दा. गो. काळे / ०२**
- हिंदू उर्फ सिंधू (समीक्षा) / **देवनूर महादेव / अनुवाद : शोभा नाईक / १२**
- ज्ञानपीठ पुरस्कृत हिंदू : एक समृद्ध अडगळ (समीक्षा) / **दिलीप झवेरी / अनुवाद : नितीन दादरावाला / १६**
- हिंदू : समाज व संस्कृतीचे महाख्यान (समीक्षा) / **अनिल राय / अनुवाद : गिरीश काशिद / २१**
- डबलडेक्कर (कथा) / **विवेक वसंत कुडू / २७**
- नद्यांचं स्त्रीत्व उलगडताना (पुस्तक परीक्षण) / **वर्षा गर्जेंद्रगडकर / ३९**
- पाब्लो नेरूदाची संस्मरणं : आठवणींचा बहरता वृक्ष (आत्मपर - ४) / **संजय आर्वीकर / ४३**

- मुखपृष्ठ : गणेश विसपुते (कागदावर नाईफ, अक्रिलिक रंग, १८" × १२")
- आतील मांडणी : केतन बंगाल
- चित्रे/रेखाटने : जितेंद्र साळुंके, अजित अभंग

- 'पाब्लो नेरूदाची संस्मरणं' या लेखातील छायाचित्रे, Pablo Neruda : Absence and Presence (Tr. Alastair Reid), W. W. Norton & Co. New York, १९९० या पुस्तकातून साभार.




# डबलडेक्कर


विवेक वसंत कडू

काळ्या दगडी पाट्यावर पापडाच्या पीठाचा ऊंडा कुटला आणि त्याचा गोळा बायकोकडे दिला. आज आगोठीसाठी दीड किलोचे पापड लाटायला घेतले होते. पापड लाटायला शेजारची बाईही येणार होती. तोपर्यंत सारी तयारी करून ठेवायची होती. गोळ्याचा लोळ बनवायचा आणि पापड लाटण्यासाठी चांदण्या पाडायच्या. कुटलेला गोळा बायकोने हाताला तेल लावून दोन चारदा रबरासारखा ताणला. पुन्हा पुन्हा ताकद लावून खेचला आणि त्याचा पाटावर लोळ बनवायला घेतला. जस जसा लोळ तयार होऊ लागला तस तसा त्या तेलस पिवळ्या लोळाकडे पाहून माझ्या डोळ्यात डबलडेक्कर उगवू लागला.

मी दुसरा ऊंडा कुटायला सुरुवात केली. खाली काळा दगडी पाटा. मध्ये ऊंडा. अन हातात एक मोठा लोखंडी रॉड. बहुतेक मोठा नटच होता. जोवर पीठ एकजीव होत नव्हतं तोवर लक्ष त्या उंड्याकडेच होतं. नंतर थोडा विचारात गढलो. सवयच होती माझी ती. एका बाजुने फटके मारणे आणि दुसऱ्या बाजूने विचार सुरूच होते. थोडासा मनात हसून म्हणालो, 'कैक जणांना काहीतरी करायचं असते पण मार्ग सापडत नाही, असेच सडून मरून जातात. जनगणनेत तसा कॉलम पण नसतो. आपल्याला जो मार्ग सापडलाय तो एकदम भारी आहे'.

म्हणजे तो असा नाही की आपण रानातून चाललोय. कीर्र काळोख आहे आणि दूरवर चमचमती गोष्ट दिसतेय. आपण निरखून पाहतोय. तो दिवा नाही... मशाल नाही... जळती पणतीही नाही. बहुतेक तेच असावं. मणीधारी सापानं मणी बाहेर काढला आहे आणि त्याच्या प्रकाशात तो कीटक खात हिंडतोय. सापाच्या नकळत मला त्या मण्यावर शेण किंवा चिखल टाकायचे आहे. पावसाळा नाही म्हणून चिखल नाही. आपण सैरभर होऊन शेण शोधतोय. आपल्याला शेण सापडत नाही. आपण जिवाच्या आकांताने शेण शोधतोय पण ते आपल्याला सापडत नाही. काही क्षणांचा अवधी... शेण सापडलं तर मालामाल नाहीतर कंगाल... बैचेन... शेण सापडतच नाही... नको... हा मार्ग फार रीस्की आहे. डायरेक्ट सापाशी पंगा नको. साला तो आपल्या डोळ्यात डोळे घालून बघायचा. या कीर्ररानात शेण शोधतानाच आपल्याला दुसराच साप चावला तर पुन्हा वांधे... समजा शेण सापडले आइण नेम चुकला तर... हा मार्ग नकोच नको... तो मणीधारी साप नको आणि त्याचा मणी नको.

मुंबई चौफेर पेपरात एक बातमी आली होती. बातमीतलं गाव समुद्र किनाऱ्याच्या आसपास होतं. बातमीत एक तरुण होता. तरुणाच्या स्वप्नात कोणी योगी पुरुष यायचा आणि दृष्टांत द्यायचा अन् सांगायचा 'ऊठ वत्सा, मी आहे तुझ्या कुळाची देवता. नीट ऐक मी काय सांगतो. तू खूपच कष्टाळू आणि कनवाळू आहेस. आजवर तू खूप सोसलेस, पण आता भोगवटा संपलाय. तुझ्या कुळाचा उद्धार तुझ्याच हातून होणार आहे. तूच त्यास लायक आहेस. तुझ्या घराखाली धन आहे. कुठल्याशा राजाने ते इथं पुरून ठेवलय. ओसरीच्या बरोबर मधोमध. ऊठ वत्सा, ऊकर तुझं घर'. या बातमीवरून नक्की या तरुणाच्या बाबतीत काय झाले असेल? या दृष्टांताने त्याला दिवसाढवळ्या दागदागिन्यांचं... सोन्याच्या मोहरांचं स्वप्न पडत असेल. वेडा साला. त्याचं घर वाळूच्या पायावर उभं होतं. गड्याने एखाद्या रात्री खोदायला सुरुवात केली. सारी वाळूच ती. आवाज नाही. खोदायला पहार आणि फावडा घेतला. रात्रीच्या पोटात वाळूच्या गर्भात एक थरारक साहसी कामगिरी. रात्रभर त्याचं खोदणं चालूच. सायला किंवा गाभण असलेली कुत्री त्याच्या अंगात आलेली असावी. खोदतच राहिला तो. काळ्या अंधारात ओलसर वाळूच्या वासात त्याला सोन्याचा हंडा त्याला दिसत असावा. अंदाज नाही दिशा नाही. कितीचा मोबाईल असेल त्याच्या जवळ. बाराशेचा... बाराशेच्या मोबाईलचा उडेड तो किती... तो खोदच राहिला... आणि अचानक धप्प. खोदणं बंद. सकाळी घरच्यांनी शोधला... सकाळी मग दुपारी मग रात्री. सापडला नसेल. घराच्या शेजारी खोदल्याची बातमी कुणी तरी दिली असेल. घरच्याचं डोकं फिरलं असणारच. मग जेसीबी. जेसीबीच्या आवाजात लोकांची उत्कंठा. मग एक वाळूने भरलेला मृतदेह. रडारड. चर्चेला उधाण... आपला मार्ग असाही नाही.

माझं फटके मारणे सुरूच होते. बायको काहीतरी म्हणाली, 'गेल्या वर्षापेक्षा चून मऊसूद कुटलं आहे.' त्या वेड्याचं गुदमरणं माझ्या गळ्याशी आलं होतं बायकोच्या पुटपुटण्याने तंद्री भंग पावली माझा फटका चुकला. ठणकन आवाज आला. चूनाला दगडी खच लागला. बायको वैतागली. काळा पाटाही शेजाऱ्याचा आहे तो भरून द्यायची पण आपली ऐपतन नाही. आयला बायको. एका मिनिटात कौतुक दुसऱ्या मिनिटाला आयमाय.

हा श्रीमंत होण्याचा मार्ग मला कोणी दिला ते आधी सांगतो. मी ज्या कंपनीत कामाला जातो त्या कंपनीत मला हिरा भेटला. हिरा आमच्या कंपनीचा ड्रायव्हर. बारा गावचं पाणी प्यायलेला. सगळी दुनिया फिरलेला. रस्तान् रस्ता पाठ. जगाचं ज्ञान. ज्या दिवशी ट्रिप नसायची तेव्हा नाशिकहून भाजी आणण्याच्या ट्रिपा मारायचा. तेही नसेल तर कंपनीत कॅप्सूल प्रेसवर काम करायचा. बारा भानगडी. एक दिवशी माझी रात्रपाळी होती. आम्ही दिलेलं टारगेट पूर्ण करून घेतलं. तो पुठ्ठ्यांच्या खोलीत झोपायला गेला. मी त्याच्या मागोमाग गेलो. च्यायला याच खोलीत पहिल्याच दिवशी माझा उंदराने डबा कुरतडला होता. तो झोपायला पुठ्ठे अंथरत होता. मला त्याने धनवंतराव म्हणून हाक मारली आणि म्हणाला 'काय या कंपनीत कुजत राहिलात, तुमच्या मनात झटपट श्रीमंत व्हायचं स्वप्न तरळते आहे.' याला कसं माहित. तुम्ही तरी धनवान होण्याचा मार्ग सांगा. मी त्याला झटपट श्रीमंत व्हायची माझी ईच्छा व्यक्त केली. आमच्या गप्पा सुरू झाल्या. त्याने मला एकेक मार्ग सांगितले. पहिला मार्ग डबलडेक्करचा. 'बोले तो मुंडल्ल्या... बोले तो दुतोंड्या... बोले तो मादीखाद्या... बोले तो अरथ बोबा... दोन तोंडाचा साप असतो तो एका माणसाला आणून द्यायचा. आपण एक फोन नंबर देणार. ऊसको कॉन्टेक करनेका. सौदा पुरा होने के बाद मेरूकू खाली पाच हजार लाके देनेका'. एकदम संजय दत्त त्याच्यात घुसला होता. या सोबत दुसरा मार्गही त्याने सांगितला. आपल्या जवळच वाड्याला एका जंगलात एक बाबा पैशाचा पाऊस पाडतो. दहा दिले की वीस पाडतो. पण मुहूर्त जुळून आला पाहिजे. या दुसऱ्या सल्ल्याचे पैसे नाहीत.

एवढं सांगून तो झोपला. मी विचार करीत राहीलो. कोणता मार्ग निवडायचा. काही असो साला आयुष्यात पुठ्ठ्याच्या राशीत वास घेत घेत झोपायचं नाही. सुरुवातीला आपल्याला या कंपनीत कंटेनर धुवायचे काम दिले होते. कंपनीच्या बाहेर जिथं ससे आणि उंदीर ठेवले होते तिथं. भर दुपारच्या उन्हात उंदीर, ससे आणि मी... त्यांना शेड तरी होती... पण असूदे. उंदीर आणि सश्यांना एकेका बॅचचं इंजेक्शन टोचलं जाई. तेव्हा त्यांच्या अंगाला आलेल्या गाठी बघून मला वाईट वाटे. त्या पिंजऱ्यातील कोबीच्या पानांचा, गाजरांचा आणि लेंड्यांचा मिक्स वास नाकात भरून आहे. हा वास मला काढायचा आहे. या कंपनीतला सोळाशे ते साडेनऊ हजार हा प्रवास मला खंडित करायचा आहे. मी कुणाशीही कोणताही पंगा न घेतलेला माणूस आहे. माझी कंपनीत भला माणूस अशी ओळख आहे. पण भलेपणा आणि चणचण एकाच कॅप्सूलमध्ये नाही भरता येत. जिथं तिथं पैशांमुळे गोची होते. इतके दिवस आपण ध्येयलेस होतो. आता आपल्याला मार्ग सापडले आहेत. हिराने सांगितलेल्या सापाच्या मार्गाची खात्री पटावी म्हणून मी घाबरत घाबरत त्या नंबरवर फोन लावला. एक साप पंधरा लाख... पंधरा लाख ओ माय गॉड...

या दोन्ही मार्गापैकी कोणता मार्ग निवडायचा. दुसरा मार्ग आपल्याच परिसरातला आहे. पण आपल्याजवळ काय घंटा आहे. त्याला काय द्यायचं आणि काय तो पाडणार. हा मार्ग जर खरा निघाला तर आपल्या मॅनेजरला पटवू तो पैशांचा फार लालची आहे. सारखा इथं टाकले तर डबल होतील तिथं टाकले तर टिबल होतील. फ्लॅट, जमीन, गुंठे, फंड असे काय काय बोलत असतो. आपण त्याला एका दिवसात डबल करायची एकदा ऑफर देऊ. एकदा सक्सेस मिळाला तर नंतर आपला स्वतंत्र व्यवहार चालू करू. आपला मॅनेजर जबरदस्तीने डीमार्टला घेऊन जातो. पैसे याचे आणि साला खरेदी आपल्याला करायला

सांगतो. बायको याची आणि फॉल बिडिंग केलेल्या साड्या आपल्याला आणायला लावतो. आता आपण त्याच्यावर जबरदस्ती करू. पण प्रत्यक्ष खात्री करून घेतली पाहिजे. मी इकडून तिकडून पैशाच्या पावसाची हळूहळू माहिती काढली. आत्याच्या मुलाचा एक मित्रच यात सहभागी आहे असे कळले. त्याने माझी त्या मित्राशी गाठभेट घडवून दिली. सुरुवातीला तो असं काही मान्य करायला तयार नव्हता. मला फक्त एकदा येऊ द्या, अशी पुन्हा पुन्हा त्याला विनंती केली. गुपचुप बसायचं या बोलीवर मला त्याने पैसे पाडणाऱ्या बाबाकडे न्यायचं कबुल केलं.

बाबाकडे रात्री जायचा प्लॅन होता. मी संध्याकाळी विक्रमगड बस पकडली. मित्र आणि मित्राचे मित्र कारमधून येणार होते. बसमध्ये कोडं सोडवायला पेपर घेतला होता. कोडं सोडवता सोडवता रीफिल संपली. पेपरच्या कोपऱ्यावर घास घास घासली पण काही नाही. इथं घासायला एकही लाकूड नाही. रीफिल संपलेलीच होती. एक पेन वाला होता पण तो फार पुढं होता. बाहेर पाहिलं तर काळोख. रीफिलीसोबत मी बालपणात घुसलो. रिफिलीला आम्ही गोळा म्हणत असू. माझ्या पेनातला गोळा संपला. आईला म्हटलं मला पेन दे नाहीतर गोळा दे. आईने थोडा वेळ विचार केला आणि ती दुकानाकडं गेली. आधी साडेछत्तीस रुपयांची उधारी भर आणि मग पोराला शिकव असे म्हणून दुकानदाराने तिला परत पाठवलं. माझ्या हट्टाला तिने बदडून काढलं. माझ्याकडं एक बोटभर पेन्सिल होती. तिला विळ्यानं टोक काढून मी गृहपाठ लिहिला. नंतर काही दिवसांनी गोळा आल्यावर गरीबी गिरवून काढली. पैसा आला की भार्गचं पेन घेतो एक कोडं सोडवायला. कोड्यावरून मी बाबाच्या ट्रॅकवर आलो. पैशांचा पाऊस कसा असेल. पैशाचा पाऊस... अनुभव खतरनाक... रोमांचकारी असेल. माझ्या पायाला एक मच्छर कडकडून चावला. मच्छर बसमध्ये शक्य आहे. मामाच्या गावी केवढे मच्छर होते. मामाच्या मोठ्या मुलाने पैज लावली. जर तू शंभर मच्छर मारले तर तुला वीस पैसे देईन. मी कितीतरी वेळ मच्छर मारीत होतो. शंभर मच्छरांची रास अजुनही आठवते. आपला मॅनेजरही असंच काही करतो का? पुढच्या सीटच्या फटीतून मोबाईलमधली गाणी ऐकू आली. भरदे झोली मेरी या मुहंम्मद अली... लौटकरमी जाऊ न खाली... भर दे... मला नंतर झोप लागली. गच्च भरलेल्या बसमध्ये नोटांचा पाऊस पडताना मी पाहत होतो. कंडक्टर ओरडला विक्रमगड. मी विक्रमगडला उतरलो.

काही वेळाने त्यांची गाडी आली. भारी गाडी होती भारी लोक त्यात बसले होते. मला ते बाबाचा माणूसच समजले. मला गाडीत मागच्या सीटवर कोंबले. ठरल्या जागी बाबाचा माणूस आम्हाला घ्यायला आला. एकाशी काहीतरी बातचीत झाली आणि तो पुढं झाला. गर्द झाडीतून आम्ही निघालो. अवघड पायवाट होती. मध्येच थोडी शेतं लागली आणि नंतर खूप घनदाट जंगल... रातकिड्यांची किरकिर बाकी सब सन्नाटा. त्या रात्रीला काळी हाव सूटली होती. सगळ्याच्या मेंदूत पैशाचं द्रव डुचमळत होतं. काळ्याकुट्ट रानात ॲंड्राईड मोबाईलच्या प्रकाशाची चमचमती कीड पुढं चालली होती. मी सगळ्यात मागं होतो. रस्ता दाखवणारा माणूस काहीच बोलत नव्हता बाकी थोडं थोडं बोलत होते. पैसा त्याचा आपण थोडी काही बोलणार. खिशात काही नसलं की आपसूक मुकंपण येते. बायको आपल्याला बरोबर ओळखते.

आम्ही जवळजवळ पाऊण तास चालत होतो. तेवढ्यात ती जागा अचानक आली. आत घुसायचा रस्ता अरूंद होता. झाडापानांनी शाकारलेली एक मोठा झोपा होता. आतमध्ये धुराळ वातावरण. झोप्याच्या मधोमध एक होम होता. त्या होमात थोडी धुकधुकी होती. पेटलेले नारळ होते. पिठाच्या चपट्या बाहुल्या... पिठाच्या गोल ऊंड्यांना अबीराचे डोळे... होमाभोवती माणसांच्या कवट्या आणि हाडे. सायल्याची पिसं भोपळ्यात खोचली होती. त्या झोपडीच्या आजूबाजूच्या गवताने शाकारलेल्या भिंतीवर बैला म्हशीची शिंगांसहित हाडकी तोंडं होती. मी जरा मागंच होतो. गळ्यात कवड्यांच्या माळा, केसांच्या जटा झालेला माणूस होमासमोर वाघाच्या कातड्यावर बसला होता. त्याच्या हातात मोरांच्या पिसांचा गुच्छा होता. त्या गुच्छ्याने तो त्या कवट्यांवर आलटून पालटून मारत

होता. त्याच्या कपाळावरचा तेलस भगवा रंग डोळ्यात खुपत होता. तो काय बोलत होता हे सलग समजत नव्हतं पण मध्ये मध्ये कळायचं...

ए डोकऱ्या... आबाल जरा फाड... ना पैशाचा पानी जरा पाड...

मग थोडसं घुमणं...

ये पैसे डबल कर... ना जरा... गरीबाची झोली भर...

हं हं हं हं... छूं... छूं... छूं... ए...

डोकऱ्या... सतरा पायल्यांची फरी... पाड पैशांच्या सरी...

मग तो शांत झाला. मध्येच तो आमच्याशी बोलायला लागला. आणलेले पैसे कवट्यांच्या समोर ठेवायला सांगितले. बाबाने सगळ्यांना खाली बसायची आज्ञा केली.

'डोलं मिटका... मिटका डोलं... कोनी मदयुस जर उगडलं तर पानी थांबल पैशाचा'.

घुमता घुमता बाबा स्थिर झाला आणि कळवळायला लागला.

आम्ही डोळे मिटले. कान टवकारले. नुसता आवाज. मी कल्पना करू लागलो. गोवऱ्या गालांची लक्ष्मी... तिच्या मऊसूत हातातून एकेक नोट पडते आहे. मी मधोमध बसलो आहे. शंभर, पन्नास, दहा, वीस, नव्या, मळलेल्या, चुरगळलेल्या, लूळ्या, रंगलेल्या मध्येच पाचच्या पण नोटाच नोटा पडताना त्यांचा स्पर्श माझ्या अंगाखांद्याला होत आहे. पैशांच्या नोटांनी भुई भरली आहे. माझ्या मांड्यांना जाणवते आहे. मी मान उंचावून तिच्या डोळ्यात बघण्याचा प्रयत्न करतोय. तिच्यापर्यंत माझी नजरच पोहचत नाही. तितक्याच मला मुंगी चावली... माझी तंद्री भंग पावली.

बाबा ओरडला, 'फालसट, फालसट... कोन तरी काले मनाचा यान हाय. कोणीतरी डोलं उगडलं. त्याजून हात आखडता घेतला. मुरूत बिस्कटला.'

लक्ष्मीच्या जागी बाबाचे विस्फारलेले डोळे. सगळे एकमेकांकडे पाहत होते. डोळे कोणी उघडले? आणलेल्या रकमेपेक्षा जास्त पडले की कमी? पैसे पडायच का थांबले? सगळे विचार करू लागले. गळ्यात सोनसाखळ्या असलेल्या एकाने माझ्याकडे कुत्र्यासारखे पाहिले. मला झोपड्याबाहेर हुसकावले.

इथंही अपमान. सगळ्यांचा रोष माझ्यावर होता...

मी काळ्याकुट्ट अंधाराकडे बघत एकटाच उभा होतो. अंधाराचा जबडा माझा चावून चावून चोथा करतोय असं वाटलं. औकातीच्या टेपऱ्यावर ठेवून माझी खांडोळी केली जातेय असं वाटलं. अंधाराची महाकाय प्रेस आपला रक्ताळ पत्रा करते आहे असे वाटलं.

पण आपल्या वाटण्याला काय अर्थ आहे? मी बराच वेळ अपमान गिळत उभा असताना ते सगळे बाहेर आले. मेन रस्त्याला येऊन विक्रमगड मधील एका भुयारी बार मध्ये घुसले. यांच्या बोलण्यावरून अंदाज आला. एकूण रकमेच्या सत्तर टक्केच पैसा पडला होता. बॅड लक... नेक्स टाईम. ते सगळे पीत पीत चुकचुकत होते. एकदोघे जण माझ्याकडे रागाने पाहत होते. मी आश्रीत असल्याने मला शेजारच्या टेबलावर अंडा बिर्याणी दिली होती. त्यांना थोडी चढल्यावर त्यांची महत्त्वाकांक्षा ऐकून चक्रावलोच. ते श्रीमंत होते त्यांना अजून श्रीमंती हवी होती. त्यांच्या बोलण्यावरून अजून एक गोष्ट कळली. एका बाबाने तर होमासमोर नागवी बाई बसविण्याची इच्छा व्यक्त केली होती... बाई अरेंजही झाली. तिला फिफ्टी परसेंट हवे होते. ती त्या बाबासमोर नागवी उभी राहिली होती. बाबाने तिला प्रश्न केले की तू या अगोदर कधी पाखडलास का... तर तिने 'हो' असे उत्तर दिल्याने तिथे पैशांचा पाऊस पडू शकला नाही... आम्ही तिथून निघालो.

मला हार पत्करून चालणार नाही. आपला खिसा सदैव रिकामा... ही जी पिशवी सोबत सतत वागवतोय तीही रिकामी. आपल्या छोट्याशा स्वयंपाक घरातले डबे रिकामे. आपल्या बायकोचा गळा रिकामा. तिचे हात रिकामे. सगळ्या रिकाम्यापणात अनेकांची डोकी घुमत असतील त्यापैकी मीही आहे. मी कंपनीत कामाला जायचो. बरेचसे पैसे तिकिटावर खर्च व्हायचे. खूप दिवसांपासून कंपनीत कामाला जातोय पण हाताशी

काही नाही. पैसा कमावण्यासाठी विविध प्रयत्न केले पण सर्व फोल गेले. जरा स्वभावानं बरा म्हणून बायको मिळाली. तिही पुन्हा पुन्हा माहेरी जाते. एका अर्थाने बरे आणि एका अर्थाने वाईटही. तीही कुठल्याशा मार्केटिंग चेनमध्ये काम करायचे म्हणते आणि लोकांना हळद दळून देण्याचा व्यवसाय माहेरी चालू करूया असे म्हणते आहे. कर बाबा, तेवढाच संसाराला हातभार. आपल्याला कोणत्याही मार्गाने पैसा हवा आहे. माझा मोर्चा मी डबलडेक्करकडे वळवला. डबलडेक्कर तर सत्य वस्तू आहे, त्यात काही अंधपणा नाही, त्यात कोणताही बाबा नाही. त्यात सामूहिक भानगडी नाहीत. अशी समज मी मनाला करून घेतली.

मी डबलडेक्कर बद्दल माहिती गोळा करू लागलो. सार्वजनिक वाचनालयाचा ग्रंथपाल चक्रावला. हे कंपनीत जाणारं इकडं कसकाय फिरकलं. त्याला कुठे माहित आहे की बारावीला असताना चुलत मामाची छोटीशी लायब्ररी वाचून काढली आहे. त्याचा पोरगा रात्री सिगरेट पीत जाड जाड पुस्तकं वाचायचा ती पुस्तके गुपचूप वाचून काढली आहेत. मी ग्रंथालयातल्या माणसाना म्हणालो, 'सापांची माहिती देणारं पुस्तक द्या.' लायब्ररीत आपण अचानक आणि त्यातही साप. तो संशयाने पाहत राहिला. माहिती फार जास्त नव्हती. डबलडेक्करचा रंग चॉकलेटी असतो. त्याला दोन बाजूला तोंड नसतात... ही गोष्ट जेव्हा मला माहित पडली तेव्हा धक्काच बसला. हे कस काय शक्य आहे. पुस्तकात लिहलं आहे म्हणजे खरं असावं. जाऊ दे आपल्याला सापडेल तेव्हाच बघू त्याला दोन तोंड असतात की एक. साली माणसांना पण असतातच ना.

माझे भावजी कासवांच्या मागावर असायचे. या एका मुद्द्यासाठी मला भावजी बरे वाटू लागले. कासवाच्या फंदात मी कधीच पडलो नाही. एकाच धंद्यात दोघे नको, नाहीतर बहिण म्हणायची आपला भाऊ आपल्या नव्याच्या नशीबात आडवा येतोय. त्यांना एकवीस नख्यांचं कासव हवं होतं. भावजींनी सगळ्या विहिरी धुंडाळल्या. नव्या गावात गेले की विहिर आवर्जून डोकावायचे. तळ्याच्या ठिकाणी मुद्दाम भेट द्यायचे. त्यांना हिवाळ्यातल्या दिवसातलं तलावातल्या दगडींवर पडलेलं ऊन फार आवडायचं. कासवं त्यावर ऊन खात बसायची. कासवं जिवंत पकडण्याची सर्व साधनं त्याच्याकडे होती. झेला होता पागेर होता. गावच्या बाहेर असलेल्या पंचक्रोशीतल्या सगळ्या विहिरीमधली कासवं त्यांनी पकडली होती. आपल्या भावजींना 'वेडा सख्या एकवीस नख्या' असं नाव पडलं. या टोपणनावाचं मला नवलच वाटलं होतं. च्याचला आपल्यालाही डबलडेक्कर असं नाव पडायचं. सावध राहिलं पाहिजे.


भावजी कासवं पकडायचे आणि त्यांच्या म्हशींच्या गोठ्यात घमेल्याखाली आणून ठेवायचे. रात्री ऊठून गुपचूप बॅटरीच्या उजेडाने त्यांची नखे शोधायचे. कासव सापडलं की त्यांची ऊमेद जागी व्हायची आणि कासवाच्या शेवटच्या पायावरच्या विसाव्या नखावर संपायची. ही सगळी कासवं ते आपल्या शेतातल्या बावखलात सोडून द्यायचे. कधीतरी त्यात राहिलेली कासवं पुन्हा पकडून पहायचे. कदाचित एखाद्या कासवला एकाविसावं नख फुटलं असेल. भावजींना एकवीस नख्यांचं कासव सापडो आणि आपल्या बहिणीच्या हातातून म्हैशींचं शेण सूटो. ती कधी घरी आली तरी तिच्या अंगाला शेणाचा वास यायचा. तेव्हा फार वाईट वाटायचं. मला कासवाअगोदर तो साप सापडला पाहिजे. मीच माझ्या बहिणीला पहिल्यांदा शेणमुक्त करेन.

भावजींचं कासव आणि डबलडेक्कर यात पैज लागली तर कोण जिंकेल. एक होतं कासव आणि एक होता डबलडेक्कर. दोघंही स्लो... जाऊदे दोघंही दोघांना सापडू दे. आमच्या गाड्या सूसाट वेगाने पळू दे. मी भावजीसारखाच त्याच्या शोधात निघायचो. बैलगाडी जाण्यायेण्याच्या गराडीत धूळ असते. ती धूळ पाहत सर्व गराडीने हिंडायचो. एखाद्या सापाने जर रस्ता क्रॉस केला तर त्याच्या जाण्याने धुळीत एक तेलस रस्ता तयार होतो. त्या सापखूणांवरून मस्त कळतं की कोणता साप गेलाय त्याची साईज कळते.

जनावर कडवं असो की साधं, एक थंड धूळखूण मागे सोडून जातं. मी तसा माग दिसला की रस्त्याच्या दोन्ही बाजूंचा परिसर छान मारायचो. धूळखूण लहान असली तर तिच्या नादी लागत नसे. मला अंदाज असायचा की ते मण्यार, नानेटं, रूखय किंवा हरणटोळ असावी. पण जर धूळखूण जाड असली तर मन म्हणायचे... हा डबलडेक्कर असावा. शोधायला गेलो तर ते फोडसं निघायचं किंवा फुत्कार मारणारा कांबळ्या असायचा. च्यायला तिथं डबलडेक्कर कधीच नसायचा. मला काही करून डबलडेक्कर हवा होता.

जळी स्थळी काष्ठी पाषाणी फक्त डबलडेक्कर. बांधाने चाललो तरी त्याचा सूस्तपणा खूणावायचा. बांधांच्या बिळाबिळातून तो किलकिल्याने नजरेने डोकावतो असा मला भास व्हायचा. रानातून जाताना पाळापाचोळ्यातून सळसळ ऐकू आली तरी तो स्तब्ध व्हायचो थोडं थांबून कान देऊन ऐकायचो ही कशाची सळसळ आहे. आता सर्व सळसळी माझ्या ओळखीच्या झाल्या होत्या. सरड्याची सरसर... थोडं थांबणं... पुन्हा थोडी चाल... खारूची सरसर... पटकन या झाडावरून त्या झाडावर... लाव्हरीच्या थव्यांची पळापळ... सलग... गुडूप... सलग... गुडूप... सापाची सळसळ... काही क्षण सलग एखाद्या पानाची कडा घासत जातानाचा आवाज... डबलडेक्कर हा थंड सूस्त शांत तो अशी सळसळ करणारच नाही... मला नेहमी वाटायचं की एखादी थोडी हालचाल होईल... आपण डोकावून पाहू... आताच वितळवलेल्या कॅडबरीचा चमचमता रंग दिसेल... मग काठीने त्याला आपण उचलू... मग आपल्या अंगात एक आनंदाची सळसळ सळसळून जाईल.

दिवसा आपलं मिशन पूर्ण होणार नाही याची मला जाणीव झाली. आपला शोध दूरवर वाढवला पाहिजे. म्हणून मी दूर रानात जायचं ठरवलं. दूरवर लोकांच्या शेतात राबासाठी खापून ठेवलेले उक्शीच्या झुडुपांचे ढीग मी उचकून पाहायचो. मला डबलडेक्कर काही दिसायचा नाही. नारळाच्या झावल्यांचे ढीग.



अजित अभंग

शेवग्यांच्या ओंडक्यांचे ढीग शेणाचे गोवर मी सगळं उचकटून पहायचो पण काही नाही.

कंपनीत काहीबाही कारणं सांगून मी रजा टाकायचो. आपल्या शोधात इतर अनेक अडथळे असावेत असे वाटायचे. मी कोणत्या रंगाचा कोणता शर्ट... कोणत्या रंगाची कोणती पॅन्ट घालू... कोणत्या वारी कोणत्या दिशेने कोणत्या मुहूर्तावर जाऊ... कोणाला भजू कोणाला पुजू... कुठे चादर किती नारळ चढवू... कोणाचं तोंड पाहू... सगळे भेटले तरी चालतील पण मंदिराचा पुजारी भेटता कामा नये. तो खरपोशी तोंडाचा आहे, असं गाव म्हणतं. त्याचा चेहरा पाहिला की माणसं मागं फिरतात सतत देवाच्या जवळ असणारा माणूस खरपोशी. त्याने डुकरांचा फार्म टाकलाय. डुकरं लय आडदांड झाली की टेम्पोत रवानगी करतो. त्याचा मंगलाष्टकांचा आवाज आणि डुकरांचं आकाशभेदी चिरकणं यात सांधेजोड मस्त करतो. पण गडी फार्मात आहे. जेव्हा भटभिक्षुकी करायला जातो तेव्हा एमएटी घेऊन जातो आणि जेव्हा तो भट नसतो तेव्हा तो एव्हेंजर गाडी काढून फिरतो. भारीच जमतं त्याला हे सगळं. मी सकाळी निघताना त्याला चुकवायचो.

माझ्या कंपनीत कदम नावाचा मित्र होता. तो म्हणाला, कोकणात चल तुला बाईंग नावाचं भूत मिळवून देतो. तू झटपट श्रीमंत होशील. तुझ्या घरी लक्ष्मी पाणी भरेल. धनधान्य, सोनेनाण्यांची रीघ लागेल. त्याचा भूताखेतांचा फार अभ्यास होता. बॅक्स नावच्या बेटांमध्ये दगडात भूतं राहतात आणि माणसाची सावली त्यांच्यावर पडली की ते माणसाला गिळंकृत करतं. असं काही काही सांगायचा. नको बाईंग भूत आपल्याला त्याची खूप पाल करावी लागते. जर त्याच्यात कसूर केलं तर तुमचं होतं नव्हतं तेही निघून जातं. नको आपल्याला हे भूत, आपण आहोत ते बरे आहोत.

कंपनीत कॅप्सूल चोळता चोळता, घरात जेवता जेवता, डमडम मध्ये बसता बसता माझ्या मनात विचार यायचे. काय करीत असतील या डबल्याचे. हं काही लोक आपल्या ईच्छांच्यापूर्ते तेसाठी कराडो रूपये उधळतात. नीताताईंचा मोबाईल तीनशे अकरा कोटींचा आहे.

जगात महागडी दारू पिणारे असतात.

डबलडेक्करांचे मांस चविष्ट आणि महाग असावं. की त्यांचं काळीज त्याच्याच रक्ताबरोबर प्यायला तर देत असतील.

की त्याच्या अंगातून निघणाऱ्या द्रव्याचे औषध बनवत असतील. त्या औषधाने माणसाचे वार्धक्य हिरावून तारुण्यातला नवा जोम येत असेल.

की डबलडेक्करला जाळून त्याची राख नशीली पदार्थ म्हणून ओढली जात असेल.

विचार करून डोक्याचा भुगा व्हायचा. जाऊंदे, आपल्याला डेकरू मिळण्याशी मतलब. कुत्ता जाने ना चमडा जाने. चमडा... हो कदाचित एखाद्या राजकन्येच्या कमरेला मोबाईल कव्हर म्हणून डबलचं चामडं लावत असतील. कदाचित.

डबलडेक्कर आपल्या बिळातून छोटे छोटे खडे बाहेर काढतो असे मी ऐकले. तसे मीही माझ्या स्वप्नांचे खडे काढायचो. आपल्याला मर्सिडिज नको पण ब्रीझा चालेल. पावसाळ्यात रस्त्यावरचं पाणी फर्रकन उडवता येईल. सारी माणसे उकाड्याने हैराण असतील तेव्हा आपण एसीत असू. पांढरंशुभ्र शर्ट आणि शर्टाच्या खिशातून आरपार दिसणारा ॲप्पलचा फोन. मॅनेजरच्या खिशात असतो तसा. एखाद्या फळवाल्याच्या दुकानासमोर एखादा माणूस पैसे काढण्यासाठी आपलं पाकिट काढतो आणि त्यात त्याची पाच सहा बँकांची कार्ड दिसतात तशी आपल्याला कार्ड हवी आहेत. शर्टाची ही तीनशे चारशेची रेंज ओलांडायची आहे. उंची परफ्यूम मारायचे आहेत. एक चांगलं घर हवे आहे. बाथरूममध्ये बाथटप हवा आहे. वाफेच्या रूममध्ये अंगाचा घाम काढायचा आहे. एकट्याला फिरायला एक अव्हेंजरसारखी गाडीही हवीय. मासळी मार्केटमध्ये जाऊन ऐटीत एक किलो पापलेट आणि किलो दाढा घ्यायचाय. हॉटेलमध्येत गेल्यानंतर पदार्थ आणि त्यांचे रेट बघून जी धडकी भरते. आपण खिसा

आणि ऑर्डर यांची जी जुळवाजुळव करतो ती थांबवायची आहे. बायकोच्या सर्व इच्छा पूर्ण करायच्या आहेत. ढकलता वॉर्डरोब उघडला तर किमान पन्नास साड्या दिसल्या पाहिजेत. कोणत्याच फंक्शनला तिची साडी रिपीट होता कामा नये. या प्रत्येक साडीवर बिंदीपासून सँडलपर्यंत सेट असावा. पाहुणे आल्यावर वयीवरून कपबश्या मागायची वेळ येऊ नये. मला एकदा तरी डान्सबारमध्ये जायचे आहे. तेलगी सारखे पैसे नाही पण पन्नास शंभरच्या थोड्या नोटा उडवायच्या आहेत. ऐशोआरामात जिंदगी काढायची आहे, चारपाच पिढ्या बसून खातील एवढं कमवायचं आहे. दोन तीन नको. आपली एकच पीढी बस. डबलडेक्कर फार कमी खडे काढतो आणि आपल्या ईच्छांचे तर डबर आहेत. पण अर्जंट सोनोग्राफी करता येईल स्वत:च्या पैशात, कुणाकडे हात पसरायला लागता कामा नये. भावाला हर्नियाच्या ऑपरेशनसाठी थोडेतरी पैसे देता येतील. एवढे पैसे आपल्याजवळ असावे असेही वाटले.

कुणीतरी म्हटले डबलडेक्कर 'पॉक' असा आवाज काढतो. मुंडल्या पॉक. असेल तो तसा आवाज काढत; कारण आहेच तसा तो. या आवाजाचा मला नादच लागला. बेडकांचे 'पॅकपॉक' मुंडल्याचा नुसता पॉक. हा आवाज माझ्या मनीमानसी रूळला. माझ्या तोंडाला चिकटला. कुणी काही म्हटले, पेपरातली विधाने वाचली तरी माझ्या तोंडातून कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष 'पॉक' असं निघायचं. बायको वैतागून म्हणायची, जरा संसाराचा सिरीयसली विचार करा. तो तेंदू बघा काल- परवापर्यंत एसटीच्या पुढच्या सीटवर बखा वासून झोपायचा. त्याच्या निंबुद्धपणाला लोकांनी तेंदू असं नाव ठेवलं. पण आज अंगणात चार ट्रक आहेत. त्याच्या गणपती दर्शनाला चार इन्स्पेक्टर घरी येतात. पैसा कमावतो तो. मी म्हणायचो... पॉक. आपला देश प्रगती करतो आहे. आता अच्छे दिन येणार... प्रत्येकाच्या अकाऊंटमध्ये पाच लाख जमा होणार... मी म्हणायचो पॉक. आपण नाही मजा केली पण आपल्या होणाऱ्या पोरांना तरी हवे ते देऊ. मी म्हणायचो... पॉक. मी मरता मरता चांगलं एक घर बांध... मी म्हणायचो पॉक च्यायला हे पॉक प्रकरण अतीच झालं. पुन्हा घाबरलो. आपल्याला 'पॉक' नाव पडायचं.

याच दरम्यान सासुरवाडीला गेलो आणि आतल्या खोलीत आराम करीत होतो. तर एक मडकं मला दिसलं. मडक्यावरून एक गोष्ट आठवली. ही गोष्ट मला आता अर्ध्यापर्यंतच आवडते. एका कुणबी बाईने ही गोष्ट सांगितली होती. फार फार वर्षापूर्वी एका गावात एक जोडपं राहात होतं. त्यांचं नुकतंच लग्न झालं होतं. नवरा आळशी होता. काही कामधंदा करीत नसे. बायकोने त्याला जबरदस्तीने बाहेरगावी कामधंद्यासाठी पाठवलं. घरातून निघताना त्याला तिने मडकाभर सरबत करून दिलं. नवरा परगावी निघाला. रस्त्याला जाताना तो थकला आणि एका झाडाखाली झोपला. झाडामागून एक साप निघाला त्या सापाने त्या मडक्यातले सर्व सरबत प्याले आणि तो साप त्याच मडक्यात बसला. जाग आल्यावर त्याने सापाला मडक्यात बसलेले पाहिले. टोचून बोलणाऱ्या बायकोचा बदला घेण्यासाठी ही नामी संधी होती म्हणून त्याने एका कापडाने त्या मडक्याचे तोंड बांधले आणि मडके घेऊन घरी आला. बायकोचा काटा काढू. तिला सांगू की रस्त्याला आपल्या अक्कल हुशारीने एक काम पूर्ण केले आणि त्याचं आपल्याला एक बक्षिस मिळालं. तो लगेच परतल्याचे पाहून बायको संतापली. बायकोला त्याने वरीलप्रमाणे समजावले. बायकोने विश्वास ठेवून आत हात घातला. तिनं हातात काहीतरी पकडलं सर्पदंश सोडाच तिच्या हातात हिऱ्यांचा हार होता. बस्स, मला ही लोककथा इथपर्यंतच आवडते. आपल्या मनाची सोय झाली ना बस. पुढे ते बालक आणि तो राजा आणि ती राणी याच्याशी मला काही घेणं देणं नाही. आपल्याला बायकोला मारायचेही नाही. आपल्याही सापाचा असा हिऱ्यांचा हार होणार आहे.

पण सापडतच नाही डबलडेक्कर. निराश झालो. कसं जगायचं? सोडून देऊ हे सगळं आणि चिंचकढी खाऊ. एकच शर्ट, वर्ष दोन वर्ष वापरू. माणस

जगतातच ना कुढत कुढत! कुठे मिळतं सगळ्यांना आपल्या मनासारखं? आयुष्यात आलेली बायको नवरा... एकमेकांविषयी किमान अठ्ठ्याण्णव जणांची तक्रार असेल. बारावीला फिजिक्स शिकवणारा आपला मास्तर लेक्चरच्या शेवटी नेहमी म्हणायचा, 'आपण मराठीचा शिक्षक व्हायला पाहिजे होतं.' मराठीचा टेम्परी शिक्षकाच्या चेहऱ्यावर हसू कधी दिसलंच नाही. कोण खुश आहे आज? आपण बायकोला सांगू, बाई आपण एवढच कमावतो. तू सहाशे सातशेच्या रेंजमध्येच राहा. सोनं शुद्ध बेन्टेक्स घाल. मी तुला वनग्रॅमच्या सोन्याने मढवीन. राहू समाधानाने. फार फार नाही खायला मिळणार सुरमाई; पण अजून मांदेळ्यांचा वीसचा वाटा मिळतो आहे बाजारात. आयुष्याशी मांडवली करू. मध्यम मार्ग स्वीकारू. आपल्याला एकच डोकं आहरे. आपण एकाच डोक्याने जगू. हे सुस्तावलेलं आणि बाह्य जगाने लादलेलं दुतोंडीपण नको. ज्याला हे आपल्याला सर्व सांगायचे आहे तो लंगोटी मित्र तर गायबच झाला आपल्या जिंदगीतून. आपण बारावीपर्यंत, तर तो बीएस्सी झाला. एमस्सी झाला. नोकरीला लागला. आता कधी प्रवासात जरी भेटला तर राम राम राम असा लिहित असतो. नुसता वह्या भरतो आहे. तो सांगेल का आपल्याला यातून कसं बाहेर पडायचे ते?

माझा मोठा भाऊ सुरतला रेतीवर कामाला होता. तो चार मालकांना जेवण बनवून द्यायचा. ते मालक चौघे पार्टनर होते. त्याला लोक 'भंडारी' म्हणत. रेती व्यवसायातल्या जेवण बनविणाऱ्या माणसाला भंडारी म्हणतात. तो असल्या तसल्या विद्येच्या मागे नव्हता. कष्ट करावे आणि खावे या धोरणाचा होता. त्याला रोज तीनशे रुपये मिळायचे. माझं आणि त्याचं या बाबतीत पटत नसे. माझं डबलडेक्करचे वेड त्याला कळले तेव्हा तो वैतागला होता. पण एके दिवशी त्याचा मला फोन आला. त्याचा आवाज जरा दबकाच होता. ''तुला जी गोष्ट पाहिजे ती इकडे मिळाली आहरे. सापडला आहे दोन तोंडाचा साप''. मला काहीच सूचेना; फक्त आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. हा फेक मारणार नाही याची मला कल्पना होती. च्यायला, यालाच कसा सापडावा? मी त्याला धडाधड प्रश्न विचारले. कुठे सापडला? किती किलोचा आहे? त्याला आत्ता कुठे ठेवलाय? काय खायला घालशील? मेलाय की जिवंत आहे? कसा दिसतो तो? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे त्याने दिली. वापी नदीच्या काठी त्याला तो सापडला. अडीच ते तीन किलोच्या दरम्यान आहे. त्याला आत्ता बिसलरीच्या डब्यात ठेवलाय. त्याला भोकं पाडली आहेत. घालीन काहीतरी. जिवंतच आहे. चहापावडर सारखा दिसतो पण चकचकीत शिसवासारखा. शिसव ठीक आहे, पण चहापावडर? हां, तो भंडारी आहे ना. त्याच्या या फोनने मी बेहद्द खुश झालो. आपला शोध संपला. अग मैना ग मैना तुझी हऊस पुरवीन... हे गाणं गुणगुणत होतो. बायकोने बाजारातून मुशीचं पाव किलो खारं आणून त्याच्या पळसाच्या पानात पुड्या बांधून ठेवल्या होत्या. तिला आज मी ऑर्डर केली. आज मुशीच्या खाऱ्याची भाजी कर. आता तुझा वनवास संपला.

वापीला जाऊन बिसलरीची बरणी घेऊन आलो. त्याला डोळे भरून पाहिला. खाटेखाली ठेवला. तेलसच होता मुंडल्या. डोळे फार किलकिले. शांत सूस्त होता. काही हालचाल नाही. जरा गवरूच होता. उत्सुकता म्हणून हळूच त्याला काडी लावून पाहिली तर थोडाच विळविळला. कांबळ्या असता तर फुत्कार केला असता. एवढी महागडी वस्तू आपल्या घरात पहिल्यांदा येतेय याचं मला विशेष वाटलं. आपल्या बापजाद्यांनी जे केले नाही ते आपण केल्यानं अभिमानानं छाती भरून आली. बायकोला म्हटलं आरती कर ना त्याला. बायको अंगावर धावून आली. गरीब डबलडेक्करवर कांबळ्या फुत्करावा तशी. पण बायकोच ती नवऱ्याच्या कामगिरीत ती सहभागी झाली. किचकळत किचकळत तीने आरती ओवाळली. त्यात मलाही तीने ओवाळलं. हा डबलडेक्करचा धंदा एकदा मार्गी लागला की चांदीच्या ताटात तीने मला नाही ओवाळलं तर नावाचा मी नाही. माझं नाव धनेश नाही.

मी त्या नंबरवर फोन केला मागच्या फोनचा संदर्भ

देऊन त्याला मी सांगितलं, मला साप सापडला आहे. तो म्हणाला, ''जागा आणि वेळ सांगतो, तुम्हाला एका सापाचे पंधरा लाख मिळतील. येताना एक बॅग किंवा कापडी पिशवी घेऊन या. येताना पंचवीस हजार रूपये घेऊन या.'' पैसे लागतील याचा अंदाज त्याने आधी दिलेला होताच. आंतरराष्ट्रीय स्तरावर हा व्यवहार चालतो म्हणून सुरुवातीला हा पैसा लागतो. मी इकडून तिकडून पैसा गोळा केला. तीनेक हजार खर्चासाठी घेतले. पैसे इतरांकडून घेताना प्रत्येकाला लगेच पैसा देण्याचा वायदा दिला. हाही मामला रात्रीचा होता. त्यांनी मला शहापूरच्या सरळगावाला बोलवलं. शहापूरवरून जायचे कसे? मी मित्राला पटवलं. तो गाडी घेऊन यायला तयार झाला. मस्तान वाडा, शिरीष फाटा, आटगाव, शहापूर करीत मी सरळगावला पोहोचलो. त्याला फोन केल्यावर परत यायची विनंती केली. तो तयार झाला. संध्याकाळ झाली. कॉर्नरवर मिसळ खाल्ली. आठच्या सुमारास सांगितलेल्या खुणेवर तयार होतो. एक मॅक्स गाडी आली. ड्रायव्हर उतरला, माझ्या हातातला शंकराचा फोटो त्याने पाहिला आणि मला तो चला म्हणाला. दरवाजा उघडला, आत डोकावलो... ऑलरेडी त्यात बरेच बसलेले होते. मी बाटली म्हणजे डबलडेक्कर मांडीवर घेऊन बसलो. पुढच्या सीट आणि मागच्या सीटला नवेच पडदे लावलेले होते. ड्रायव्हर जरा मिशाबिशा लावलेला वाटला. हा व्यवहार अवैध म्हणून त्याने खोट्या मिशा लावलेल्या असाव्यात असा मला अंदाज आला. गाडी पुढे निघाली. ड्रायव्हरने आम्हालाही डोक्याला फडकी बांधायला दिली. सक्तीने डोळ्यावरून बांधायला सांगितली. पोलीस आपल्या मागावर असतात आणि तुम्ही डायरेक मालकाशी संपर्क साधू नये म्हणून हा सगळा खटाटोप. माझ्या सोबतच्यांची सर्वांनी डोळ्यांवरून फडकी बांधली. मला दिलेल्या फडक्याचा वास येत होता. मी पंचवीस हजार कमरेला बांधले होते ते सारखे खुपत होते. पंधरा लाखांचा अंधार डोळ्यावर ओढवून घेतला होता. अंधारात सोन्यानी मढलेली लक्ष्मी, सोन्याच्या कासवावर बसलेली बहिण, पैशांची बंडल, फोर व्हिलर, भावाकडे राहणाऱ्या आईला पाचशेची नोट देताना तिच्या चेहऱ्यावर आलेलं हसू, धनेश भाऊ... बायकोची सोनोग्राफी करायची आहे. एक हजार रुपये द्या. क्षणाचा विलंब न करता पाकिटाकडे गेलेला आपला हात. असं मला काय काय दिसत होतं. अचानक गाडी रस्त्यात आदळली. मी भानावर आलो. गाडी तीनेक तास चालली असावी. मग अर्धाएक तास खडबडीचा रस्ता आणि आणि पुढे अजून उबडखाबड रस्ता होता. मग थोड्या वेळाने गाडी थांबली. पत्रा करकरण्याचा, मोठ्ठा दरवाजा उघडल्याचा आवाज आला. गाडी पुन्हा थोडी सरकली. थांबली. ड्रायव्हरने सूचना केली. सांगितल्याशिवाय कुणीही उठायचं नाही. थोड्या वेळाने दरवाजे उघडले. डोळ्यावरचे कपडे सोडण्याची ऑर्डर आली.

एवढा वेळ पट्टी बांधलेली सोडली आणि गरगरल्यासारखे झाले. आम्ही सगळे सहाजण होतो. आम्हाला ओळीने उभे राहायला सांगितले. बहुतेक सगळ्यांनी डबलडेक्कर आणला होता. कुणी पिशवीत तर कोणी पंधरा लिटरच्या गिनीच्या बरणीत. निरखून पाहिले तर ते एक गोडावून होतं. आजूबाजूला शेतातल्या अनेक वस्तू होत्या. पाईप लाकडं. गोडावून मधला उजेड फारच फिका होता. समोर तीन आडदांड माणसे बसली होती. त्यांच्या शेजारच्या टेबलावर काळ्या बॅगा होत्या. असं स्पष्ट दिसत नव्हतं. चोरीचा मामला त्यामुळे असं असावं. त्यातला मधला म्हणाला, आपापले डबलडेक्कर आणून इथं ठेवा आणि प्रत्येकाच्या शेजारी पंचवीस हजार ठेवा. आम्ही अतिशय शिस्तीत ते पैसे आणि बरण्या पिशव्या नेऊन ठेवल्या. मधल्यानं पुन्हा उजवीकडे दूर पाहिले तर चटकन दोन माणसे आली आणि पैसे आणि साप घेऊन गेली. तिसरा म्हणाला, जरा सापांचं टेस्टिंग चालू आहे ते झालं की प्रत्येकानं आपापली बॅग उचलायची आणि जसे तुम्हाला आणलं आहे तसं तुम्हाला सोडलं जाईल. तितक्यात आमच्या मागाहून पाचसहा आडदांड माणसं निघाली त्यांच्या हातात जाडजाड काठ्या होत्या. आत्ता आपलं काही खरं नाही.

आता मार पडतो असा विचार करण्याच्या अगोदरच त्यांनी मांड्यांवर मारायला सुरुवात केली. मी तर पहिल्या फटक्यातच आडवा झालो. जिवाच्या आकांताने आम्ही ओरडत होतो. नको आम्हाला काय नको, आम्हाला मारू नका आमचं काय चुकलं ते तर सांगा. एकेक रट्टा असा बसत होता की मेंदू बधीर व्हावा. भयानकच. साले थांबून थांबून मारत होते. मी बेशुद्ध झालो... मला जेव्हा जाग आली तेव्हा सकाळ झाली होती मी कुठल्याशा फाट्यावर टाकला गेलो होतो सगळं अंग ठणकत होतं ते वळतही नव्हतं. जेमतेम चोरकिसा चाचपला, तर पैसे नव्हते पण खिशाला काहीतरी लागलं. खिशात त्यांनी दोनशे रुपये टाकले होते. कसाबसा सरळगावपर्यंत आलो. मित्राला बोलावले. तो येईस्तोवर एका हॉटेलच्या बाहेर बसून होतो. माशा घोंगावत होत्या पण त्यांना हाकलण्याकरिता अंग हलत नव्हतं. हॉटेलवाला तिरप्या नजरेने संशयाने बघत होता. मित्र आला. सीटवर बसताही येत नव्हते. कसाबसा घरी पोहचलो. बायकोने जो उद्धार केला तो त्या मारापेक्षाही भयंकर होता. बायकोने नातेवाईकांना सांगण्यासाठी, नवऱ्याचे प्रताप सावरण्यासाठी पुन्हा एक कथा रचली. ''आमचे हे किनई त्या दिवशी कंपनीचा टेम्पो घेऊन नाशिककडे जात होते...''

खरं म्हणजे असंच्या असं काही घडलंच नाही पण विक्रमगडचा बाबा जेलमध्ये आहे. त्याने काळा पैसा पाडण्याच्या कामासाठी पिंजाळ नदीच्या काठावर गाडलेल्या माणसांचे मृतदेह उकरून काढले होते. तिकडे सुरतला एका रेतीत मालकाला असा डबलडेक्कर सापडला. त्यांनी तो आणून बिसलरीच्या वीस लिटरच्या रिकाम्या कॅनमध्ये ठेवला. कॅनला होल पाडले. रेतीचा धंदा नोटाबंदीमुळे ठप्प होता म्हणून ते संध्याकाळी नदीजवळच्या झोपड्यात रोज प्यायला बसायचे आणि मध्ये कॅन ठेवायचे आणि अंदाज बांधायचे. या सापामुळे तरी कडकी दूर होईल या हिशोबाने त्यांनी इकडे तिकडे फोन लावून पाहिले पण काही नाही. मग त्यांनी तो साप पलिकडच्या तीरावर सोडून दिला. विचारा भोळा भंडारी त्याला चहापावडर खायला घालायचा. इकडे धनेश या फेजमधून चालला होता पण त्याचे डोळे ग्रंथालयातच डबलडेक्करच्या किलकिल्या डोळ्यांनी उघडले. आजूबाजूच्या झकपक वातावरणाचा चंदेरी धुरळा सर्वसामान्य माणसे जसा पचवून टाकतात तसाच त्याने पचवला. मॅनेजरसोबत दारू पिताना, त्याला कंपनी देताना धनेशला दोन प्रश्न पडले.

पहिला प्रश्न... धनेशच्या कंपनीचा मॅनेजर, एका पक्षाचा शाखाध्यक्ष, एक वरिष्ठ महाविद्यालयाचा प्राध्यापक, एक रेतीवाला आणि एक तलाठी यांनी पैसे डबल होण्यासाठी एक एक लाख रुपये काढले होते. ते त्यांनी तिजोरी उडविणाऱ्या बाबाला दिले आहेत... त्यांना दोन दोन डोकी आहेत का?...

दुसरा प्रश्न... ती नागवी झालेली बाई कोण...? या दुसऱ्या प्रश्नाचा विचार करता करता त्याला भिती वाटली. आपली बायको धावत धावत येऊन विचारणार तर नाही ना की, या रूपयावर असलेल्या इंदिरा गांधीच्या गळ्यात असलेल्या माळेत रूद्राक्ष आहे का? माहेरी तिने हळद फोडायचा व्यवसाय सुरू केला आहे. स्वत: प्रत्येक हळदीचा घाटा ती फोडते. काळ्या हळदीने घरात बरकत येते. असे म्हणतात.

ती काळ्या हळदीच्या शोधात तर नाही ना?

